# भारत जोडो युवा अकादमी
# व
# साने गुरूजी रूग्णालय व संशोधन केंद्र किनवट
# संयुक्त वार्षिक अहवाल – सन 2024-25

-----------------------------------------------------------------------

**07.04.2024**

**भारत जोडो युवा अकादमी आणि साने गुरूजी रुग्णालयातर्फे जागतिक आरोग्य दिन साजरा**

**7 एप्रिल 2024** – जागतिक आरोग्य दिनानिमित्त **भारत जोडो युवा अकादमी** आणि **साने गुरूजी रुग्णालय** यांच्या संयुक्त विद्यमाने एक प्रेरणादायी व आरोग्यविषयक जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता वाढवणे व 'सर्वांसाठी उत्तम आरोग्य' या संकल्पनेचा प्रचार करणे हा होता.

या कार्यक्रमात आरोग्य तपासणी शिबीर, पोषणविषयक मार्गदर्शन, व्यसनमुक्तीबाबत माहिती व जनजागृतीपर माहिती देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अशोक बेलखोडे होते, तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. विजय काळे यांनी उपस्थितांना आरोग्याचे महत्त्व समजावून सांगितले.

**09.04.2024**

**भारत जोडो युवा अकादमी आणि साने गुरूजी रुग्णालयतर्फे इफ्तार पार्टीचे आयोजन**

भारत जोडो युवा अकादमी आणि साने गुरूजी रुग्णालयाने एकत्र येऊन इफ्तार पार्टीचे आयोजन केले. या कार्यक्रमात विविध समाजघटक एकत्र आले, समाजात एकतेचा संदेश दिला आणि सांस्कृतिक विविधतेला प्रोत्साहन दिले. रमजान महिन्यात रोजे सोडण्याच्या या समारंभाने एकता आणि परस्पर समर्पणाची भावना मजबूत केली.

या कार्यक्रमाला किनवट नगरीतील मुस्लीम समुदायातील नागरिकांची उपस्थिती होती त्यात माजी नगराध्यक्ष इसाखान सरदार खान, योगगुरू अखिल खान, जहिर खान, साजिद खान, हिना भाटी यांच्यासह साने गुरूजी रूग्णालय परिवारातील सर्व सदस्यांची उपस्थिती होती.

**11.04.2024**

**साने गुरुजी रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले जयंती साजरी.**

साने गुरुजी रुग्णालयाच्या सभागृहात दिनांक 11 एप्रिल 2024 रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. अशोक बेलखोडे व रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण केली. त्यानंतर त्यांच्या सामाजिक कार्याची आठवण करून देणारे विचार वाचन आणि माहितीपर भाषणे झाली.

रुग्णालयाचे संचालक डॉ. अशोक बेलखोडे यांनी आपल्या भाषणात सांगितले, "महात्मा फुले यांनी शिक्षण, सामाजिक समता आणि स्त्री-शिक्षणासाठी आयुष्यभर कार्य केले. त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन आपण सर्वांनी समाजातील गरजूंपर्यंत आरोग्यसेवा पोहोचवावी, हेच त्यांच्या कार्याला खरे श्रद्धांजली ठरेल."

**14.04.2024**

**भारत जोडो युवा अकादमी आणि साने गुरूजी रुग्णालयातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी**

**14 एप्रिल 2024** – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 133 व्या जयंतीनिमित्त भारत जोडो युवा अकादमी आणि साने गुरूजी रुग्णालयाच्या वतीने एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात बाबासाहेबांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्यात आला आणि त्यांच्या विचारांची प्रेरणा सर्वांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अशोक बेलखोडे होते. त्यांनी आपल्या भाषणात बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि राज्यघटनात्मक योगदानाची सखोल मांडणी केली. गावातील अनेक मान्यवर नागरिक, तसेच साने गुरूजी रुग्णालयाचे सर्व कर्मचारी या प्रसंगी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात भैय्याकाका बेलखोडे यांच्या हस्ते बाबासाहेबांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. कु. तेजस्विनी उईके यांनी सुत्रसंचालनाची जबाबदारी समर्थपणे पार पाडली. कार्यक्रमाच्या शेवटी विकास बोलेनवार यांनी उपस्थितांचे आभार मानले. डॉ. विजय काळे यांच्या बुद्धवंदनेने कार्यक्रमाची सांगता झाली.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून उपस्थितांना डॉ. आंबेडकर यांच्या दूरदृष्टीपूर्ण विचारसरणीची आणि सामाजिक समतेसाठी केलेल्या प्रयत्नांची नव्याने जाणीव झाली.

**01.05.2024**

**साने गुरूजी रुग्णालयात महाराष्ट्र दिन साजरा**

किनवट, साने गुरूजी रुग्णालयात 1 मे रोजी महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. रुग्णालयातील, डॉक्टर, नर्सेस, रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. यानंतर उपस्थितांनी एकमुखाने 'जय महाराष्ट्र'चा गजर करत राज्यप्रेम व्यक्त केले. रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेवर आधारित गीतं सादर केली.

या प्रसंगी रुग्णालयाच्या वैद्यकीय संचालक डॉ. अशोक बेलखोडे यांनी भाषणात सांगितले की, "महाराष्ट्र दिन हा आपल्या राज्याच्या प्रगतीचा, सामाजिक एकतेचा आणि सांस्कृतिक समृद्धतेचा प्रतीक आहे. आरोग्य सेवा हीदेखील महाराष्ट्राच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहे."

## विज्ञान, छंद व साहस शिबीर

**(04 मे ते 10 मे 2024)**

**राष्ट्र सेवा दल किनवट** तर्फे आयोजित विज्ञान, छंद व साहस शिबीर साने गुरूजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल एम.आय.डी. सी. कोठारी किनवट येथे संपन्न झाला.

04 मे ते 10 मे 2024 दरम्यान आयोजित या निवासी शिबीरात नांदेड, देगलूर, हिंगोली, मुंबई, बोथ मंडल (तेलंगणा) आणि किनवट तालुक्यासह 16 गावांतील 60 मुले आणि 64 मुली असे एकुन **124** विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**दिनांक 04 मे रोजी** या शिबीराचे उद्‌घाटन -एच. डी. एफ. सी बँकेचे शाखा व्यवस्थापक श्री. प्रकाश जकाते यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी किनवटचे माजी नगराध्यक्ष के. मुर्ती हे होते, शिक्षक श्री राम बुसमवार प्रमुख पाहूणे म्हणुन उपस्थित होते.

सात दिवस चाललेल्या या निवासी शिबीरात दररोज दोन सत्रात झांज, लेझीम, एरोबिक्स, कॅलस्थेनिक मैदानी खेळ, समुह खेळ, नृत्य इत्यादी प्रशिक्षणे शिबीरार्थींना देण्यात आले. यासाठी राष्ट्र सेवा दल कोल्हापूरचे प्रशिक्षक राज कावळे व शुभम चौगले आले होते.

### विज्ञान सत्रात ...

- डॉ. बालाजी जबादे - गणितातील गमती जमती
- करीयर मार्गदर्शन - नितीन मुर्मे, नागपूर
- संशोधक संजय भंडारी - सुर्यचुल मार्गदर्शन
- राम बुसमवार - जपानी भाषा व सिडबॉल निर्मीती
- संजय बोलेनवार यांनी घरगुती उपकराणांची दुरूस्ती,
- अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे राज्य सचिव माधव बावगे यांनी बुवाबाजीचे प्रयोग यावर सप्रयोग मार्गदर्शन केले.
- डॉ. अशोक बेलखोडे यांनी प्रथमोपचार प्रशिक्षण दिले.

### बौध्दीक सत्रात ..

- डॉ. बेलखोडे यांनी सेवादलाची पंचसुत्री,
- अशोक मुन्ने, नागपूर, अपंग गिर्यारोहक
- आरती तिमांडे, नागपूर

## **छंद वर्गात** ...

- गणितातील गमती जमती - डॉ. बालाजी जबादे
- संतोष ताडुरकर यांनी चित्रकला व कोलाज  कला
- पोलिस स्टेशन व दवाखाना भेट
- नितीन टापरे यांनी कचऱ्यातुन कला निर्माण करत विविध वस्तु बनविण्याचे प्रशिक्षण व प्रात्यक्षिक दिले.

## **साहस सत्रात...**

पैनगंगा अभयारण्याचे वनक्षेत्रपाल श्री धिरज मदने यांची वन्यजीव संरक्षण व पर्यावरण संवर्धन या विषयी चर्चा व मार्गदर्शन

## **इतर वेळा व रात्रीच्या सत्रात**

- मागील 15 वर्षातील शिबीराचे फोटो दाखविले,
- शिबीरार्थींचे विविधकला-गुण सादर करण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम,
- डॉ. अपुर्वा व मानसी यांचे दंत आरोग्य शिबीर
- शिबीरार्थ्यांकडून फिडबॅक

## **समारोप सोहळा .....**

या सात दिवशीय निवासी शिबीराचा समारोप सोहळा दि. 09 गुरूवारी रोजी सांयकाळी 4.00 वाजता करण्यात आला. अध्यक्षस्थानी  प्रा. रामप्रसाद तौर, प्रमुख अतिथी बालाजी कोंपलवार यांच्यासह मंचावर पालक प्रतिनीधी बळीराम राठोड, प्रमुख पाहूणे नवनिहाल सिंग जहागिरदार, प्रा. डॉ. नाना शिंदे, डॉ. प्रदिप नागपूरकर, के. मुर्ती, प्रकाश घोडके यांच्यासह शिबीर संयोजक डॉ. अशोक बेलखोडे हे उपस्थित होते. दि. 10 रोजी सकाळी ध्वजारोहणानंतर शिबीरार्थी आपापल्या गावी परत गेले.

या शिबीरात शिबीरार्थींनी शिकलेल्या कला प्रकारांचे सादरीकरण करण्यात आले.  शिबीरार्थींपैकी समिरन देशपांडे, विशाखा होळंबे, ऋषिकेश शेळके यांनी प्रातिनिधीक स्वरूपात आपली मनोगते व्यक्त केले. सायन्स महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. नानाजी शिंदे यांनी शिबीरार्थींना मार्गदर्शन करतांना विवेकी विचार अंगिकरण्याचे आवाहन केले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. प्रा. रामप्रसाद तौर यांनी सातत्याने आयोजित होणाऱ्या शिबीराची सामाजिक, सांस्कृतीक स्वास्थ्यासाठी किती आवश्यक आहे हे विचार मांडले. शिबीर संयोजक साने गुरूजी रूग्णालयाचे प्रमुख डॉ. अशोक बेलखोडे या शिबीरातुन शिकलेल्या मैदानी खेळांचे प्रशिक्षण, बौध्दीकातुन घेतलेले विचार, शिबीरातुन मिळालेले व्यसनमुक्तीचे धडे इत्यादी जे काही या शिबीरातुन आत्मसात केले ते विचार आपापल्या गावात, संपर्कातील लोकांपर्यंत पोहोचवून सेवा दलाचे सैनिक असल्याचे कर्तव्य पार पाडावे. इथे स्वत:ची कामे स्वत: केलीत, घरी गेल्यानंतर हीच शिस्त बाळगावी व स्वावलंबी व्हावे, असे आवाहन केले.

## शिबीरार्थींचा सत्कार

शिबीरार्थी मेघा अशोक सलाम, पृथ्वीराज सिताराम जाधव, क्रांतीकुमार खिरू आडे, ओम संतोष राठोड, आरूषी राजू जाधव, श्रावणी गंगाराम आचेवार यांचा प्रातिनिधीक स्वरूपात सत्कार करण्यात आला. तसेच प्रशिक्षकांचाही सत्कार करण्यात आले. याप्रसंगी संदीप चनमनवार, भैय्याजी बेलखोडे, सुनिल पाठक, ॲड दिलीप काळे, प्रा. डॉ. पंजाब शेरे यांच्यासह शिबीरार्थींचे पालक व किनवट परीसरातील नागरीकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. मानसी व्यवहारे, कु. तेजस्विनी उईके यांनी केले. सर्व सहभागी शिबीरार्थींना संयोजन समितीच्या वतीने प्रशस्तीपत्र देण्यात आले.

शिबीरासाठी प्रा. डॉ. सुनिल व्यवहारे, अनिल सुर्यवंशी, प्रा. रामप्रसाद तौर, दिनेश परजने, दिपक डंबाळे, विपीन पवार, अमोल जाधव, अनिल नेम्मानीवार, बालाजी लोणावळे, संदीप चनमनवार, हबीब चव्हाण, शब्बीर तगाले, सुनिल वाघमारे, मारोती मुनेश्वर, शिबीरार्थी ऋतुराज सुभाष सुर्यवंशी यांनी आर्थीक किंवा वस्तु स्वरूपात मदत पुरवली.

मेरसिंग चव्हाण- परोटी, कमलेश मुनेश्वर (तोटंबा), राम राठोड (खेर्डा), वसंत राठोड (मांडवी), श्री. दिपक डंबाळे (किनवट), ज्ञानेश्वर उईके (किनवट) प्राचार्य डॉ. सुभाष काळे यांनी विद्यार्थ्यांना शिबीरात सहभागी होण्यासाठी प्रवृत्त केले.

शिबीराच्या यशस्वीयतेसाठी प्रशिक्षक राज कांबळे, शुभम चौगले, सौ. सुलोचना कोंडे, सौ. आरती तिमांडे, वंदना उईके, नितीन टापरे, इमारतीची संपुर्ण व्यवस्था सांभाळणारे मनोज चनमनवार, दशरथ बेलखोडे, साने गुरूजी रूग्णालयाचे संजय बोलेनवार, अजिंक्य कयापाक, नागेश देवतळे, अजय नरड, केतन ठमके, निखील साखरे, बादल पवार, प्रेमचंद बस्सी, यांच्यासह साने गुरूजी रूग्णालयातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. शिबीरासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे मदत करणाऱ्यांचे व उपस्थितांचे प्रा. डॉ. सुनिल व्यवहारे यांनी आभार मानले.

---

23.05.2024

### साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे बुद्ध जयंती उत्साहात साजरी

किनवट – दिनांक 23 मे 2024 रोजी साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे गौतम बुद्ध जयंती शांतता आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात बुद्ध वंदना घेण्यात आली आणि उपस्थितांनी बुद्धाच्या विचारांना अभिवादन केले.

कार्यक्रमासाठी रुग्णालयातील सर्व कर्मचारी, अधिकारी तसेच रुग्ण व त्यांच्या नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'बुद्धं शरणं गच्छामि'च्या गजरात वातावरण भारावून गेले.

रूग्णालयाचे संचालक डॉ. अशोक बेलखोडे यांनी सांगितले की, "भगवान बुद्ध यांनी दिलेला अहिंसा, करुणा आणि शांतीचा संदेश आजच्या काळात अधिक महत्त्वाचा आहे. महात्मा गांधींना अहिंसेचा मार्ग बुध्दांकडून

मिळाला आहे. या कार्यक्रमातून आपण त्यांच्या शिकवणींचा आदर्श घेऊन सेवा कार्य अधिक प्रभावीपणे करणे हेच खरे त्यांना अभिवादन ठरेल असे सांगितले.

26.06.2024

**साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी**

किनवट – दिनांक 26 मे 2024 रोजी साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे सामाजिक न्यायाचे प्रणेते आणि बहुजन समाजासाठी कार्य करणारे **राजर्षी छत्रपती शाहू महाराज** यांची जयंती आदरपूर्वक साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमात शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. रुग्णालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

कार्यक्रमाच्या वेळी रुग्णालय प्रशासनातर्फे शाहू महाराजांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्यात आला. त्यांची सामाजिक समतेसाठीची लढाई, शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या मूलभूत हक्कांसाठी त्यांनी उभारलेले कार्य उपस्थितांपुढे मांडले गेले.

या वेळी प्रमुख पाहूणे डॉ. शिवाजी गायकवाड यांनी सांगितले, "शाहू महाराजांनी समाजातील वंचित घटकांसाठी जे कार्य केले, त्यातून आपण आजही प्रेरणा घेऊ शकतो. आरोग्य आणि शिक्षण हेच समाज प्रगतीचे बळ आहे."

**01 जुलै 2024**

**डॉक्टर्स डे निमित्त डॉ. अशोक बेलखोडे यांचा सत्कार**

डॉक्टर्स डे **निमित्त साने गुरूजी रूग्णालय व संशोधन** केंद्रात **आयोजित कार्यक्रमात** डॉ. अशोक बेलखोडे **यांचा** सत्कार **करण्यात आला.**

या कार्यक्रमात **प्रा. डॉ. शिवाजी गायकवाड** व त्यांच्या मार्गदर्शनाखालील विद्यार्थी, रूग्णालयातील कर्मचारी व रूग्णांचे नातेवाईक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी डॉ. बेलखोडे यांच्या ग्रामीण व आदिवासी भागातील आरोग्यसेवेसाठी केलेल्या कार्याची प्रशंसा केली आणि त्यांचे सामाजिक योगदान अधोरेखित केले.

सत्कार प्रसंगी डॉ. बेलखोडे यांनी आपल्या अनुभवांचे व मार्गदर्शनपर विचार विद्यार्थ्यांसमोर मांडले. त्यांनी डॉक्टर्स डे च्या निमित्ताने सामाजिक आरोग्यसेवेची जबाबदारी आणि वैद्यकीय व्यवसायातील मानवी मुल्यांवर भर दिला.

18.07.2024

**साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे अण्णाभाऊ साठे स्मृतिदिनानिमित्त अभिवादन**

दिनांक 18 जुलै 2024 रोजी साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या प्रसंगी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून रुग्णालयातील, कर्मचारी आणि रुग्णांच्या नातेवाईकांनी आदरांजली वाहिली. अण्णाभाऊ साठे यांच्या संघर्षमय जीवनावर आणि साहित्य कार्यावर प्रकाश टाकणारे विचार वाचन आणि भाषणे करण्यात आली.

कार्यक्रमात विकास बोलेनवार यांनी आपले विचार मांडतांना सांगितले की, “अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीद्वारे श्रमिक, वंचित आणि उपेक्षित घटकांचा आवाज बनून काम केले. त्यांच्या विचारांमधून सामाजिक समतेचा संदेश आजही तितकाच प्रभावी आहे.”

31 जुलै 2024

**महिला आरोग्य अभियानाचा वंचित, गरजू रूग्णांनी घेतला आरोग्य तपासणी शिबीराचा लाभ**

भारत जोडो युवा अकादमी संचलित, साने गुरूजी रूग्णालय व संशोधन केंद्र किनवटच्या वतीने प्राथमिक आरोग्य केंद्र कोठारी (सिं) अंतर्गत उपकेंद्र पळशी येथे पळशी, पळशी तांडा, रामनाईक तांडा, जमुनानगर, लिंगी, मांडवी, कनकी, नागापूर, लालूनाईक तांडा, पाटोदा (सि), कुंभी, किनवट येथील आरोग्य सेवेपासून वंचीत असलेल्या 127 रुग्णांनी तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी, उपचार व योग्य मार्गदर्शन सेवेचा लाभ घेतला. यात नेत्ररोग 27, दंतरोग चिकीत्सा 22, फिजिओथेरेपी 90, स्त्रिरोग विभाग 21, रक्त तपासणी 40, वयोवृध्द महिला पुरूष 17, बालके 21, गर्भवती महिला 2, युवक -युवती 26, शस्त्रक्रिया करण्यायोग्य 26 रूग्णांनी तपासणी करून घेतली.

सविस्तर वृत्त असे की, किनवट हा आरोग्य सुविधांपासून वंचित आहे, तालुक्यातील लोकांचे आरोग्य अबाधित रहावे, त्यांना आरोग्याच्या उत्तम सुविधा मिळाव्यात, तालुक्यातील आदिवासी, बंजारा व इतर महिलांचे आरोग्य अबाधित रहावे, हा उदात्त हेतू ठेवुन भारत जोडो युवा अकादमी संचलित साने गुरूजी रूग्णालयाचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ समाजसेवक डॉ. अशोक बेलखोडे (एम. एस. सर्जन) यांनी महिलांच्या आरोग्याची निगा राखण्यासाठी महिला आरोग्य अभियानाची सुरूवात केली आहे.

आरोग्य अभियानाचे उद्घाटन पळशी गावचे महिला सरपंच मंगलाताई नैताम यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करून केले. कार्यक्रमाची पार्श्वभूमी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे, कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र किनवटचे प्राध्यापक डॉ. शिवाजी गायकवाड यांनी मांडली. यात त्यांनी किनवट तालुक्यातील लोकांच्या आरोग्याचे प्रश्न, गरजा व उपलब्ध सोयी सुविधांचा लेखाजोखा मांडला. तसेच या अभियानाची गरज किती आहे हे लोकांच्या लक्षात आणून दिले.

कुटुंबासाठी सतत झटणारी महिला स्वत:च्या आरोग्याची काळजी घेत नाही, आजार अंगावर काढतात, वेळेवर जेवण करीत नाही, योग्यवेळी रूग्णालयात जात नाही व गेल्याच तर तज्ञ डॉक्टरांकडे जात नाहीत अशी अवस्था आहे असे मनोगत डॉ. अशोक बेलखोडे यांनी व्यक्त केले.

01.08.2024

**साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त अभिवादन**

दिनांक 01 ऑगस्ट 2024 रोजी साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे महान लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आणि थोर स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमात दोन्ही महामानवांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. रुग्णालयाचे अधिकारी, कर्मचारी, रुग्ण व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलतांना डॉ. शिवाजी गायकवाड यांनी सांगितले, "लोकमान्य टिळक हे स्वातंत्र्यलढ्याचे शिल्पकार होते, तर अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्याने समाजातील शोषितांना आवाज दिला. दोघांच्याही विचारांमधून आजच्या काळात प्रेरणा घेणे गरजेचे आहे.

09.08.2024 **साने गुरूजी रूग्णालयात जागतिक आदिवासी दिन साजरा**

दिनांक 09 ऑगस्ट 2024 **रोजी** जागतिक आदिवासी दिन **(World Tribal Day) निमित्ताने** भारत जोडो युवा अकादमी संचलित साने गुरूजी रूग्णालयात आदिवासी दिन साजरा करण्यात आला. यावेळी भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. तसेच संस्थेचे अध्यक्ष **डॉ. अशोक बेलखोडे** यांनी सोशल मिडियावरून व्हिडीओ संदेशाच्या माध्यमातून आपले मनोगत व्यक्त केले व सर्व आदिवासी समाजबांधवांना शुभेच्छा दिल्या.

आपल्या संदेशात डॉ. बेलखोडे यांनी आदिवासी समाजाचे इतिहासातील योगदान, त्यांच्या संस्कृतीचे महत्व आणि त्यांच्या हक्कांसाठी एकजूट होण्याचे महत्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, *"आदिवासी समाज हा भारताच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. त्यांच्या विकासासाठी प्रत्येकाने योगदान देणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे."*

15.08.2024 **साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे 76 वा स्वातंत्र्यदिन साजरा**

दिनांक 15 **ऑगस्ट** 2024 रोजी भारताचा 76 **वा स्वातंत्र्यदिन** साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे देशभक्तिपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी **8.45 वाजता** रुग्णालयाच्या इमारतीवर राष्ट्रध्वज फडकावण्यात आला.

या वेळी **संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक बेलखोडे**, **डॉ. भाग्यश्री बेलखोडे- वरटकर**, डॉ. योगेंद्र वरटकर यांच्यासह **साने गुरूजी रुग्णालय परिवारातील सदस्य**, **सर्व कर्मचारीवृंद**, **रुग्ण व त्यांचे नातेवाईक**, **शालेय विद्यार्थी**, तसेच **गावातील नागरिक** मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. भाग्यश्री बेलखोडे - वरटकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत गायन करण्यात आले व देशभक्तीपर घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. यानंतर उपस्थितांना **अल्पोपहार व चहा** वितरित करण्यात आला. उपस्थितांनी देशप्रेम व एकतेचा संदेश देणारे विचार मांडले.

कार्यक्रमाच्या यशस्वीयतेसाठी रूग्णालयातील सर्व सदस्यांनी योगदान दिले.

**17.09.2024**

## साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा

**17 सप्टेंबर 2024** रोजी साने गुरूजी रुग्णालयात **मराठवाडा मुक्ती संग्राम दिन** अभिमानपूर्वक साजरा करण्यात आला. या निमित्ताने रुग्णालयाच्या इमारतीवर **तिरंगा ध्वज** फडकविण्यात आला आणि स्वातंत्र्यलढ्याच्या वीरांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

या प्रसंगी **संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक बेलखोडे** यांनी मराठवाड्याच्या मुक्तीसाठी लढणाऱ्या **स्वातंत्र्यसेनानींच्या बलिदानाची आठवण** करून दिली. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, *“17 सप्टेंबर 1948 रोजी मराठवाडा हैदराबाद निजामाच्या सत्तेतून मुक्त झाला. हा दिवस केवळ विजयाचा नाही, तर त्याग, धैर्य आणि स्वाभिमानाचा आहे.”*

कार्यक्रमात रुग्णालयातील अधिकारी, कर्मचारी, रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक उपस्थित होते. या उपक्रमातून देशप्रेम, इतिहासाची जाण आणि कृतज्ञतेचा भाव जागवण्यात आला

02.10.2024

## साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री जयंतीनिमित्त अभिवादन.

**आज 02 ऑक्टोबर** 2024 रोजी **साने गुरूजी रुग्णालय परिसरात** राष्ट्रपिता **महात्मा गांधी** आणि माजी पंतप्रधान **लालबहादुर शास्त्री** यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन **रुग्णालय प्रमुख डॉ. अशोक बेलखोडे** यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून डॉ. शिवाजी गायकवाड हे उपस्थित होते. कार्यक्रमात दोन्ही महान विभूतींच्या प्रतिमांना **पुष्पहार अर्पण करून** त्यांना **आदरांजली वाहण्यात आली**. डॉ. गायकवाड यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, *"गांधीजींचे अहिंसेचे तत्त्व आणि शास्त्रीजींचे 'जय जवान, जय किसान' हे घोषवाक्य आजही आपल्याला प्रेरणा देतात." तर डॉ. बेलखोडे यांनी गांधीजी आणि आंबेडकर यांच्यातील देशाविषयी असलेल्या वैचारीक समानतेला विस्तृतपणे उलघडले.*

रुग्णालयातील कर्मचारी, रुग्ण आणि नागरिकांच्या उपस्थितीत शांत, सोज्वळ आणि प्रेरणादायी वातावरणात हा कार्यक्रम पार पडला.

**11 ऑक्टोबर 2024** **जागतिक बालिका दिनानिमित्त साने गुरूजी रूग्णालयात जनजागृती उपक्रम.**

जागतिक कन्या दिन 2024 **निमित्त "**Girls' Vision for the Future – भविष्यासाठी मुलींचे स्वप्न**" या घोषवाक्याचा प्रचार करत** साने गुरूजी रूग्णालयात जनजागृती मोहीम **राबविण्यात आली.**

या उपक्रमांतर्गत शहरातील प्रमुख ठिकाणी विशेष **बॅनर लावण्यात आले**, ज्यामध्ये मुलींच्या हक्कांचे संरक्षण, शिक्षण, आणि स्वप्नपूर्तीच्या दिशेने समाजाची जबाबदारी यावर भर देण्यात आला.

या उपक्रमाचा उद्देश **मुलींबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे**, त्यांचे हक्क, आत्मनिर्भरता आणि उज्ज्वल भविष्य यासाठी समाजात जागरूकता निर्माण करणे हा होता.

**18 व 19 ऑक्टोबर 2024**

**मी माझ्या व गावाच्या आरोग्यासाठी" दोन दिवसीय आरोग्य कार्यशाळा संपन्न**

भारत जोडो युवा अभियान व सेवाश्रम संचलित निसर्गोपचार रुग्णालय, हिवरा (ता. उमरखेड, जि. यवतमाळ) यांच्या संयुक्त विद्यमाने "मी माझ्या व गावाच्या आरोग्यासाठी" या उपक्रमांतर्गत दोन दिवसीय आरोग्य कार्यशाळा संपन्न झाली.

आरोग्याच्या प्रवासाची चौकटबद्ध आणि अभ्यासपूर्ण मांडणी आणि आत्मकथनमधून मनाचा आणि शरीराचा आरोग्यदृष्टीकोन समजून घेण्यासाठी ही कार्यशाळा मार्गदर्शक ठरली. ही कार्यशाळा श्री. योगेश शहारे, अध्यक्ष, भारत जोडो युवा अभियान यांच्या संकल्पनेतून घेण्यात आली.

कार्यशाळेचे उदघाटन श्री. उत्तमराव गव्हाणे (उपसरपंच हिवरा), श्री. सुदामराव वानखेडे (अध्यक्ष ग्रामविकास सेवा संस्थ, हिवरा), श्रीमती ममता गव्हाणे (सदस्य पंचायत समिती, उमरखेड), डॉ. मकरंद मुळे (संस्थापक, सेवाश्रम निसर्गोपचार रुग्णालय, हिवरा) यांच्या उपस्थितीत झाले. अध्यक्षस्थानी डॉ. मकरंद मुळे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. मकरंद मुळे, डॉ. गजानन देशमुख, डॉ. योगेश चव्हाण, डॉ. प्राजक्ता देशमुख, श्री. रमाकांत कुंभारे, सौ. गार्गी गव्हाणे यांचे मार्गदर्शन लाभले.

मार्गदर्शनामध्ये निसर्गोपचार, आहारशास्त्र, योगासन, मानसिक आरोग्य, भावनिक आरोग्य, पारंपरिक पद्धती, हर्बल औषधोपचार, व्यसनमुक्ती, संवाद आणि समुपदेशन आदी विषयांचा समावेश होता.

कार्यशाळेच्या आयोजनासाठी श्री. उत्तमराव गव्हाणे, श्रीमती ममता गव्हाणे, श्री. सुदाम वानखेडे, श्रीमती कल्पना वानखेडे, श्रीमती ममता देशमुख, श्री. रमाकांत कुंभारे यांनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यशाळेमध्ये सुमारे 50 युवक युवतींनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. गार्गी गव्हाणे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. प्राजक्ता देशमुख यांनी केले.

03.11.2024

**आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना दिवाळी भेट – नाम फाऊंडेशन व भारत जोडो युवा अकादमीचा उपक्रम**

किनवट – नाम फाऊंडेशन **व** भारत जोडो युवा अकादमी, किनवट **यांच्या संयुक्त विद्यमाने** किनवट, माहूर व हिमायतनगर तालुक्यातील 50 आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना **दिवाळी भेट** म्हणून साडी-चोळी व फराळाचे साहित्य त्यांच्या घरी जाऊन वितरित करण्यात आले.

या उपक्रमामागचा उद्देश म्हणजे सणाच्या काळात दु:खग्रस्त कुटुंबांना आधार देणे, त्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणणे आणि समाजात एकोप्याचा संदेश पोहोचवणे हा होता.

**सामाजिक संवेदनशीलतेचे उत्तम उदाहरण ठरलेल्या या उपक्रमाचे** स्थानिक पातळीवर सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. भेटवस्तू वाटप करताना स्वयंसेवकांनी कुटुंबांशी संवाद साधत त्यांच्या भावना समजून घेतल्या व मानसिक आधारही दिला.

@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@

**01.12.2024**

**साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम**

दिनांक 01 **डिसेंबर** 2024 रोजी साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे **जागतिक एड्स दिन** निमित्त विविध जनजागृती उपक्रम आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाद्वारे एड्स विषयी माहिती देऊन लोकांमध्ये या रोगाविषयी जागरूकता वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

रुग्णालयातील डॉक्टर, कर्मचारी आणि रुग्णांचे नातेवाईक उपस्थित होते. यावेळी एड्स प्रतिबंध, लक्षणे, उपचार आणि सुरक्षिततेच्या उपाययोजनांवर माहिती दिली गेली. तसेच एड्सग्रस्तांचे समाजात होणारे भेदभाव कमी करण्यासाठी संवेदनशीलता वाढविण्यावरही भर देण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान विविध शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले आणि उपस्थितांनी रोगाविषयीची माहिती घेतली.

**06 डिसेंबर 2024**

**साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 68 **व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त** साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचा उद्देश बाबासाहेबांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि संविधान निर्मितीमधील अमूल्य योगदानावर प्रकाश टाकणे हा होता.

कार्यक्रमाची सुरुवात **राजेश पाटील** यांनी सादर केलेल्या **बुद्ध वंदनेने** झाली. त्यानंतर **अजिंक्य कयापाक** यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

त्यांनी आंबेडकरांच्या सामाजिक समतेचा विचार, संविधानातील त्यांच्या भूमिका आणि शिक्षणासाठीच्या लढ्याचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमातून सामाजिक न्याय, समता व बंधुतेच्या मूल्यांचे स्मरण करण्यात आले.

कार्यक्रमास **डॉ. भाग्यश्री बेलखोडे-वरटकर**, **संजय बोलेनवार**, **परमेश्वर कदम**, **विपीन पवार**, **शेकन्ना बंडेवार**, **नितीन भडंगे**, **अर्चना डोंगरे** यांच्यासह साने गुरूजी रुग्णालयाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमात डॉ. अशोक बेलखोडे, डॉ. शिवाजी गायकवाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनकार्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विकास बोलेनवार यांनी केले तर परमेश्वर कदम यांनी उपस्थितांचे आभार मानले.

20.12.2024

**साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे संत गाडगे बाबा पुण्यतिथी निमित्त अभिवादन**

दिनांक 20 **डिसेंबर** 2024 रोजी साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे महान सामाजिक कार्यकर्ते आणि संत **गाडगे बाबा** यांच्या पुण्यतिथी निमित्त आदरांजली कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या प्रसंगी संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी रुग्णालयाचे संचालक डॉ. अशोक बेलखोडे यांच्यासह कर्मचारी, रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक या कार्यक्रमात उपस्थित होते.

कार्यक्रमात संत गाडगे बाबा यांच्या सामाजिक सेवा, स्वच्छता अभियान आणि लोककल्याणासाठी केलेल्या कार्यावर प्रकाश टाकण्यात आला. उपस्थितांनी त्यांच्या विचारांचे महत्त्व सांगितले आणि त्यांच्या आदर्शांचे अनुसरण करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाद्वारे सामाजिक समता, स्वच्छता आणि सेवा भावना वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**24.12.2024** **साने गुरूजी जयंती कार्यक्रम**

साने गुरूजी यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. यामध्ये रंगभरण व चित्रकला स्पर्धा तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या चित्रकला स्पर्धेसाठी **महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा किनवट** यांनी आर्थिक सहकार्य केले, ज्यामुळे कार्यक्रमाची यशस्वीता वाढली.

शाळेतील विद्यार्थी आणि गावातील तरुणांनी उत्साहाने या स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेतला. यामुळे साने गुरूजींच्या विचारांचा आणि कलेचा प्रसार होण्यास मदत झाली.

**26.12.2024** **बाबा आमटे जयंती**

साने गुरूजी रुग्णालयात बाबा आमटे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमात रुग्णालयातील सर्व कर्मचारी, रुग्ण व गावातील नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान बाबा आमटे यांच्या सामाजिक कार्याचे स्मरण करून त्यांच्या मानवतेच्या संदेशावर भर देण्यात आला.

11.01.2025 **स्व. शांताबाई वामनराव बेलखोडे यांचे स्मृतिदिन**

दिनांक 11 जानेवारी 2025 रोजी साने गुरूजी रूग्णालयाचे संस्थापक डॉ. अशोक बेलखोडे यांच्या मातोश्री स्व. शांताबाई वामनराव बेलखोडे यांच्या तिसऱ्या स्मृतीदिनानिमीत्त अभिवादन करण्यात आले.

आईच्या स्मृतीदिनानिमीत्त साने गुरूजी रूग्णालय परिवारातील सर्व सदस्यांनी त्यांच्याबद्दल असलेल्या आपापल्या भावना व्यक्त केल्या.

26.01.2025 **साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे 76 वा प्रजासत्ताक दिन साजरा**

**76 व्या भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त** साने गुरूजी रुग्णालय, किनवट येथे **भारत जोडो युवा अकादमी**च्या वतीने **ध्वजारोहण सोहळा** आयोजित करण्यात आला. ध्वजारोहण **डॉ. भाग्यश्री बेलखोडे - वरटकर** यांच्या हस्ते संपन्न झाले.

कार्यक्रमाला **संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक बेलखोडे**, **डॉ. योगेंद्र वरटकर**, **डॉ. विजय काळे**, गावातील प्रतिष्ठित नागरिक, शाळेतील विद्यार्थी, रुग्णालयातील सर्व कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ध्वजारोहणानंतर उपस्थितांनी **राष्ट्रीय गीत** गात **"भारत माता की जय"** अशा देशभक्तिपूर्ण घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला. यानंतर डॉ. बेलखोडे आणि प्रमुख पाहुण्यांनी प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व, संविधानाचे योगदान आणि नागरिकांच्या कर्तव्यांवर प्रकाश टाकणारे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या समाप्तीनंतर उपस्थित विद्यार्थ्यांना आणि नागरिकांना **खाऊ वाटप** करण्यात आले. हा उत्सव **राष्ट्रीय एकता, बंधुता आणि देशभक्तीचा** प्रतीक ठरला.

30 जानेवारी 2025

**महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीला साने गुरूजी रूग्णालय व संशोधन केंद्र, किनवट येथे अभिवादन**

भारत जोडो युवा अकादमीच्या वतीने आज महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त साने गुरूजी रूग्णालय व संशोधन केंद्र, किनवट येथे विशेष अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात अनेक सामाजिक कार्यकर्ते, नागरिक आणि संस्था प्रतिनिधींनी उपस्थित राहून महात्मा गांधींच्या जीवनप्रवास आणि त्यांच्या अहिंसा व सत्याग्रहाच्या तत्त्वांचा गौरव केलाश्रद्धांजली  उपस्थितांनी गांधीजींना अर्पण करत त्यांच्या विचारांना जीवनात पाळण्याचे संकल्प घेतले.

कार्यक्रमात साने गुरूजी रूग्णालय व संशोधन केंद्राच्या व्यवस्थापनाने महात्मा गांधींच्या कार्याची आठवण करून देणारी भाषणे दिली तसेच गांधीजींच्या कार्याची प्रेरणा घेऊन समाजातील समस्यांवर चर्चा केली.

भारत जोडो युवा अकादमीचे कार्यकर्ते व स्थानिक नागरिक या कार्यक्रमात सक्रियपणे सहभागी झाले आणि महात्मा गांधींच्या विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन केले.

**30.01.2025**

**साने गुरूजी रूग्णालयात ओंकार कोंडेचा सत्कार, IIT खरगपूरमध्ये प्रवेश मिळविला**

साने गुरूजी रूग्णालय व संशोधन केंद्र, किनवट येथे आज एक आनंदाचा क्षण होता, जेव्हा रूग्णालय परिवारातील सदस्य, सौ. सुलोचना कोंडे यांच्या नातू ओंकार संतोष कोंडे याने JEE परीक्षेत घवघवीत यश मिळवून IIT खरगपूर मध्ये प्रवेश मिळविला. त्याच्या यशाबद्दल साने गुरूजी रूग्णालयाच्या वतीने विशेष सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमात ओंकार कोंडेच्या शालेय व शैक्षणिक यशाबद्दल गौरव करत त्याला पुढील शैक्षणिक जीवनासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी साने गुरूजी रूग्णालयाचे व्यवस्थापक, कर्मचारी आणि स्थानिक सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

ओंकार कोंडेने JEE परीक्षेत उत्तम निकाल प्राप्त केला आणि IIT खरगपूरमध्ये प्रवेश मिळवून आई वडिलांचे नाव उज्जवल केले. त्याच्या कष्ट व समर्पणाचे कौतुक करत त्याला येणाऱ्या भविष्यात यशाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

साने गुरूजी रूग्णालयाने अशा प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन करून युवकांच्या प्रेरणादायक कामगिरीचे गौरव करण्याचा उत्तम प्रयत्न केला आहे

**03.02.2025**

**साने गुरूजी रूग्णालय परिवाराच्या वतीने मुख्याध्यापक श्री. रमेश पडगीलवार यांचे अभिनंदन**

इंदिराबाई राठोड ट्रस्ट मांडवीचे सरस विद्यालयातील नवनियुक्त मुख्याध्यापक श्री. रमेश पडगीलवार यांचे भारत जोडो युवा अकादमी संचलित साने गुरूजी रूग्णालय परिवारातर्फे उत्साहात अभिनंदन करण्यात आले.

रुग्णालय परिवाराच्या वतीने डॉ. अशोक बेलखोडे यांनी श्री. रमेश पडगीलवार यांना शाल, पुस्तक आणि मोमेंटो देऊन त्यांचा सन्मान केला. या सन्मान सोहळ्यात श्री. पडगीलवार यांनी उत्कृष्ट कार्य करणार असल्याचे सांगितले व विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षण देण्याचे आणि समाजात सकारात्मक बदल घडविण्यासाठी प्रयत्नशिल असल्याचे सांगितले.

शालेय शिक्षण क्षेत्रातील यशस्वी प्रवासासाठी श्री. पडगीलवार यांचे अभिनंदन करण्यात आले. त्यांच्या या नवनियुक्त पदावर चांगले कार्य करावे, अशी अपेक्षा साने गुरूजी रूग्णालय परिवाराने व्यक्त केली.

शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आणि शिक्षकांसाठी एक प्रेरणा म्हणून श्री. रमेश पडगीलवार यांचा सन्मान केला गेला. यावेळी साने गुरूजी रूग्णालय परिवाराचे अध्यक्ष डॉ. अशोक बेलखोडे, डॉ. भाग्यश्री बेलखोडे -वरटकर, डॉ. योगेंद्र वरटकर यांच्यासह रूग्णालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. डॉ. अशोक हे इंदिराबाई राठोड ट्रस्ट मांडवी चे सदस्य आहेत.

**15.02.2025**

**साने गुरूजी रूग्णालयात संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी**

15 फेब्रुवारी 2025 रोजी भारत जोडो युवा अकादमी संचलित, साने गुरूजी रूग्णालय व संशोधन केंद्र किनवट येथे संत सेवालाल महाराज यांची जयंती मोठ्या श्रद्धेने साजरी करण्यात आली.

संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. या वेळी गावातील प्रतिष्ठीत नागरिक आणि साने गुरूजी रूग्णालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

विपीन पवार यांनी संत सेवालाल महाराज यांच्या जीवनकार्याबद्दल उपस्थितांना माहिती दिली आणि त्यांचे कार्य सामाजिक हितासाठी किती महत्त्वपूर्ण होते, यावर प्रकाश टाकला.

संत सेवालाल महाराज यांच्या जीवनप्रवासाने सर्वांना प्रेरणा दिली असून, त्यांची जयंती साजरी करण्याचा हा एक खास उपक्रम ठरला.

*19 फेब्रुवारी 2025*

**साने गुरूजी रूग्णालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी**

*साने गुरूजी रूग्णालय* मध्ये 19 फेब्रुवारी 2025 रोजी महाराष्ट्राचे दैवत, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावर्षी जयंतीला विशेष रंगत आली, कारण कार्यक्रमात महापुरुषाच्या कार्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली आणि त्यांचे विचार समजून घेण्यासाठी अनेक प्रतिष्ठीत व्यक्तींचा सहभाग होता.

कार्यक्रमाची सुरुवात प्रा. डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील महत्त्वाच्या टप्प्यांवर प्रकाश टाकला आणि त्यांचे राज्यकारभार, युद्धकलेतील कौशल्य, तसेच समाजातील न्याय आणि समता यावर लक्ष केंद्रित केले.

त्यानंतर डॉ. अशोक बेलखोडे यांनी शिवाजी महाराजांच्या शौर्य, त्यांची प्रेरणादायक नेतृत्वशक्ती आणि त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्रात निर्माण झालेल्या सामाजिक बदलांवर विचार मांडले. मनोज चनमनवार आणि विकास बोलेनवार यांनी देखील छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणादायक जीवनाचा उल्लेख केला आणि त्यांच्या संकल्पनेचा समाजाच्या विविध स्तरांवर कसा प्रभाव पडला, याबद्दल सांगितले.

कार्यक्रमात डॉ. योगेंद्र वरटकर, डॉ. भाग्यश्री बेलखोडे - वरटकर, डॉ. पवार, डॉ. विजय काळे यांच्यासह गावातील प्रतिष्ठीत नागरिक, साने गुरूजी रूग्णालयातील कर्मचारी आणि रूग्णांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या सहभागामुळे हा कार्यक्रम अत्यंत समर्पक आणि प्रेरणादायी ठरला.

कार्यक्रमाच्या शेवटी, उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची महती जाणून घेतली आणि त्यांना आदरांजली वाहिली. तसेच, सर्व उपस्थितांनी आपल्या जीवनात शिवाजी महाराजांच्या आदर्शांचे पालन करण्याचा संकल्प केला.

या कार्यक्रमामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीला एक ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण वळण मिळाले, ज्यामुळे सर्व उपस्थितांना त्यांचे आदर्श वाचून त्यांच्यातील नेतृत्व क्षमता आणि धैर्य आणखी दृढ झाली.

@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@

24.02.2025

**राज्यस्तरीय निमंत्रित खुली जलतरण स्पर्धा**

स्थळ: महात्मा गांधी ऑलिम्पिक मेमोरियल जलतरण तलाव, शिवाजी पार्क, दादर पश्चिम, मुंबई

सहभाग: डॉ. माधुरी रायमाने, मुंबई (भारत जोडो युवा अकादमीच्या प्रतिनिधी)

राज्यस्तरीय निमंत्रित खुल्या जलतरण स्पर्धेत आमच्या संस्थेच्या सहभागाचा मुख्य उद्देश शारीरिकदृष्ट्या विकलांग खेळाडूंना पाठिंबा देणे आणि त्यांच्याशी एकता दाखवणे तसेच समावेशन आणि खिलाडूवृत्तीच्या भावनेला प्रोत्साहन देणे हे होते. हा कार्यक्रम व्यक्तींना खेळाच्या सामर्थ्याने त्यांच्या शारीरिक आव्हानांवर मात करण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी आणि प्रेरित करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम केले.

मुंबईतील सुप्रसिद्ध ठिकाण असलेल्या महात्मा गांधी ऑलिम्पिक मेमोरियल जलतरण तलावावर ही स्पर्धा पार पडली. सकाळी 09:45 वाजता उद्घाटन समारंभाने कार्यक्रम सुरू झाला, त्यानंतर जलतरण स्पर्धांना सुरुवात झाली. क्रीडापटूंनी, त्यांच्या शारीरिक आव्हानांना न जुमानता, अफाट कौशल्य, लवचिकता आणि दृढनिश्चय दाखवला, ज्यामुळे हा खरोखरच प्रेरणादायी अनुभव ठरला.

खेळाडूंचे समर्पण आणि कामगिरी अविश्वसनीयपणे प्रेरणादायी होती. लोक त्यांच्या शारीरिक मर्यादा ढकलतात आणि विविध पोहण्याच्या इव्हेंटमध्ये उत्कृष्ट कामगिरी करतात हे पाहणे आनंददायक होते.

या स्पर्धेच्या आयोजनाने सहभागी आणि स्वयंसेवकांमध्ये सौहार्द आणि समर्थनाची भावना वाढवली, समान उद्दिष्टे साध्य करण्यासाठी समुदायाचे महत्त्व दाखवून दिले. हा कार्यक्रम समावेशाचा उत्सव होता, हे दाखवून देणारा की शारीरिक अपंगत्व ही महानता प्राप्त करण्यासाठी मर्यादा नाहीत.

राज्यस्तरीय निमंत्रण खुल्या जलतरण स्पर्धेचे प्रायोजकत्व केल्याबद्दल आम्हाला खूप अभिमान आहे. हा कार्यक्रम खूप यशस्वी झाला आणि समावेशकतेला प्रोत्साहन देणाऱ्या आणि शारीरिक आव्हानांसह खेळाडूंना पाठिंबा देणाऱ्या उपक्रमाचा भाग असल्याबद्दल आम्हाला खूप आनंद होत आहे. व्यक्तींमध्ये आत्मविश्वास आणि सक्षमीकरण वाढविण्यास मदत करणाऱ्या कार्यक्रमात योगदान देणे हा एक समाधानकारक अनुभव होता

06 मार्च 2025

**वंचित, गरजू रुग्णांनी मोफतमहिला व बालआरोग्य तपासणी अभियानाचा घेतला लाभ**

अंदबोरी (चि) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र बोधडी अंतर्गत उपकेंद्र आंदबोरी (चि.), गोकुळनगर, चिखली, दहेगाव, पाटोदा या गावातील आरोग्य सेवेपासून वंचीत असलेल्या 258 रुग्णांनी त्यांची आरोग्य तपासणी व उपचार सेवेचा लाभ घेतला. यामध्ये स्त्रिरोग विभाग 109, बालरोग विभाग 58, जनरल मेडिसीन मेडिसीन 31, दंतरोग विभाग 24, फिजिओथेरपी 36 रूग्णांचा समावेश आहे.

दिनांक 06 मार्च 2025 रोजी सकाळी ठिक 09:30 ते दुपारी 03:00 या दरम्यान अंदबोरी (चि) येथे तालुक्यातील लोक, आदिवासी, बंजारा, भटके, वंचित व इतर बाल व महिलांचे आरोग्य अबाधित रहावे, हा उदात्त हेतू मनात धरुन बालक व महिला मेळाव्याची सुरूवात केली आहे. हे यावर्षीचे चौथे मोफत आरोग्य शिबीर आहे.

आरोग्य अभियानाच्या पहिल्या भागात शिबीराचे उद्घाटन अंदबोरी (चि) गावाचे मानकरी मा. श्री शिवाजी पाटील, गावचे सरपंच संजय आंबोरे यांच्या शूभ हस्ते महाराष्ट्राचे कुलदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करुन करण्यात आले.

आरोग्य संवाद कार्यक्रमात जेष्ठ समाजसेवक डॉ. अशोक बेलखोडे यांनी उपस्थित रुग्ण व नातेवाईक यांना उदेशून किनवट तालुक्यातील महिलांच्या आरोग्याच्या समस्येत वाढ होतांना दिसत आहे. अशी चिंता व्यक्त केली. कुटुंबासाठी सतत काम करणारी महिला स्वत:च्या आरोग्याची काळजी घेत नाही, ती तीचा आजार अंगावर काढते, वेळेवर जेवण करीत नाही, आराम करीत नाही योग्यवेळी रूग्णालयात आरोग्य तपासणी व उपचार घेण्यासाठी जात नाही व गेल्याच तर तज्ञ डॉक्टरांकडे जात नाहीत अशी अवस्था आपल्या किनवट तालुक्यातील माहिलांची आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे, कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र किनवटचे प्राध्यापक डॉ. शिवाजी गायकवाड यांनी उपस्थित लोकांसोबत आरोग्य संवाद साधतांना म्हणाले की, समाजाच्या विकासात डॉक्टरांची व त्यांच्या सोबत कार्य करणा-या सहकारी यांची भूमिका अत्यंत म्हणत्वाची आहे.

सदरील आरोग्य शिबीराची पार्श्वभूमी मांडतांना श्री. योगेश जाधव यांनी म्हणाले की, आपले व आपल्या कुटुंबातील व्यक्ती निरोगी रहावे यासाठी आपणच काळजी घ्यायला हवी. आपल्या गावातील सर्व महिला, पुरुष, बालके, रुग्ण, मजूर, शेतकरी, विद्यार्थी यांना आरोग्यासंदर्भात मार्गदर्शन मिळावे, तज्ञ डॉक्टरांकडून आपल्या आरोग्याची तपासणी करुन घ्यावी, योग्य उचित आपल्याला उपचार मिळावा व आर्थिक बचत व्हावी म्हणुन हे शिबीर आपल्या गावात घ्यावे अशी विनंती केली असे त्यांनी सांगितले.

शिबीरात गरजु रुग्ण व त्यांचे नातेवाईक साने गुरुजी रुग्णालयाच्या उच्च शिक्षीत व अनुभवी बालरोगतज्ञ डॉ. योगेंद्र वरटकर, MBBS MD, स्त्री रोगतज्ञ डॉ. भाग्यश्री बेलखोडे - वरटकर MBBS DGO डॉ. रोहन धसे (एम. डी. मेडिसीन) फिजीओ थेरपी तज्ञ डॉ. मधुसुदन यादव, आस्थीरोग तज्ञ डॉ. अक्षय केंद्रे व डॉ. ऋतुजा चाडावार यांच्याकडून त्यांच्या आरोग्याची तपासणी, उपचार व योग्य आरोग्य सल्ला सेवेचा लाभ घेतला.

सदरील शिबीर यशस्वी करण्यासाठी आंदबोरीचे श्री. योगेश जाधव यांनी शिबीरात लागणारा औषधी साठा मोफत दिला. तसेच श्री. उत्तमराव जाधव,, सरपंच श्री. संजय अंबोरे, कैलाश जाधव, सुभाष केंद्रे, पांडूरंग गोरे, राजू जाधव, सुमित जाध, साने गुरूजी रूग्णालयाचे कर्मचारी संजय बोलेनवार, विपिन पवार, नागेश देवतळे, परमेश्वर कदम, प्रभावती वाघमारे, कशीश निकोडे, जयश्री वाडगुरे, प्रणाली निकोडे, नागेश देवतळे, दिव्या गादेवार, आश्विनी जाधव, तेजस जाधव आरोग्य केंद्र कर्मचारी, आशा व आंगणवाडी सेविका ईत्यादीनी मेहनत घेतली.

**13.03.2025**

**महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त "कल्लोळकार" श्री. वसंत राठोड यांचा साने गुरूजी रूग्णालय येथे सत्कार**

किनवटचे भूमिपूत्र " महाराष्ट्र शासन" पुरस्कार प्राप्त "कल्लोळकार" श्री. वसंत राठोड यांचे भारत जोडो युवा अकादमी संचलित, साने गुरूजी रूग्णालय परिवार किनवट तर्फे सत्कार करण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक बेलखोडे यांनी त्यांचा शाल व पुस्तक देऊन सत्कार केला. या प्रसंगी स्त्रिरोगतज्ञ डॉ. भाग्यश्री बेलखोडे - वरटकर, बालरोगतज्ञ डॉ. योगेंद्र वरटकर, प्रा. डॉ. सुनिल व्यवहारे, डॉ. विजय काळे, डॉ. शिवाजी गायकवाड व साने गुरूजी रूग्णालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

श्री. वसंत राठोड हे इंदिराबाई राठोड ट्रस्ट तर्फे चालविण्यात येणाऱ्या मांडवी येथील सरस विद्यालयाचे मराठी विषयाचे प्राध्यापक आहेत.

**20.03.2025**

**18 वर्षाखालील मेंदूचे विकार, निदान व उपचार विषयक मोफत शिबीरात साने गुरूजी रूग्णालयाचा सहभाग**

मुंबई येथील जय वकील फाऊंडेशन, कमल उदवाडीया फाऊंडेशन आणि नांदेड येथील राजस्थानी एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने 20 मार्च ते 22 मार्च 2025 पर्यंत नांदेड येथे 18 वर्षाखालील मुलांसाठी मेंदूचे विकार, निदान आणि उपचार या विषयावर मोफत शिबीर आयोजित करण्यात आले.

या शिबीरात दिनांक 20 मार्च 2025 रोजी साने गुरूजी रूग्णालय व संशोधन केंद्र किनवटचे 12 लाभार्थी शिबीरासाठी नांदेडला पाठविण्यात आले, त्यांना मोफत प्रवास सुविधाही प्रदान करण्यात आली. या शिबीरात साने गुरूजी रूग्णालयाचे बालरोगतज्ञ डॉ. योगेंद्र वरटकर आणि फिजिओथेरेपिस्ट डॉ. मधुसुदन यादव यांनी आपली वैद्यकीय सेवा दिली.

किनवट क्षेत्रासाठी शिबीराचे व्यवस्थापन विपीन पवार यांनी केले. या शिबीराद्वारे मेंदूच्या विकारांमुळे प्रभावित असलेल्या मुलांना योग्य उपचार मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे, ज्यामुळे त्यांच्या जीवनात सुधारणा होण्याची आशा आहे.

ही मोहीम मतिमंद व मेंदूचा आजार असणाऱ्या मुलांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरली आहे.

**दिनांक:** 23 मार्च 2025

**इफ्तार पार्टीचा आयोजन: साने गुरूजी रूग्णालयाकडून एकतेचा संदेश**

**स्थळ:** साने गुरुजी रुग्णालय सभागृह
**आयोजक:** भारत जोडो युवा अकादमी आणि साने गुरुजी रुग्णालय परिवार किनवट

23 मार्च 2025 रोजी साने गुरुजी रुग्णालय सभागृहात एक भव्य इफ्तार पार्टी आयोजित करण्यात आली. या इफ्तार पार्टीमध्ये विविध धर्म, जात आणि समुदायातील लोक एकत्र आले होते. यामध्ये रमजान महिन्याच्या महत्त्वावर चर्चा केली गेली, तसेच एकता, बंधुता आणि एकमेकांना मदत करण्याचा संदेश दिला गेला.

कार्यक्रमाच्या प्रारंभात मौलाना सादत साब यांनी रमजान महिन्याचे धार्मिक महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, रमजान महिन्यात इबादत आणि पुण्य कार्यांमध्ये वृद्धी करण्याची संधी आहे. यावेळी त्यांनी गरीब व गरजू लोकांना मदत करण्याची आवश्यकता आणि महत्त्व स्पष्ट केले.

कार्यक्रमात उपस्थित असलेल्या प्रमुख व्यक्तींनी देखील आपले विचार व्यक्त केले. पूर्व नगराध्यक्ष साजीद खान, योगतज्ञ अखिल खान, आणि इतर प्रमुख व्यक्तींनी रमजानच्या महत्त्वावर विचार मांडले आणि म्हटले की, या महिन्यात सामाजिक एकता आणि बंधुत्वाचा संदेश महत्त्वाचा आहे. तसेच प्रत्येक मुसलमानावर जकात देणे आणि गरजू लोकांची मदत करणे हे एक धार्मिक कर्तव्य आहे.

डॉ. बेलखोडे यांनी समाजातील सर्व घटकांना एकत्र आणून इफ्तार पार्टीचे आयोजन केले आणि साने गुरुजी रुग्णालयाने सातत्याने इफ्तार पार्टी आयोजित केल्याबद्दल उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाच्या समारोपात डॉ. अशोक बेलखोडे आणि साने गुरुजी रुग्णालय परिवाराने उपस्थितांचेआभार मानले.

कार्यक्रमाच्या शेवटी सामूहिक दुआ करण्यात आली, ज्यात सामूहिक शांती आणि सद्भानेसाठी प्रार्थना करण्यात आली.

@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@

**28.03.2025**

**एकम फाऊंडेशन तर्फे आर्थिक सहाय्य**

एकम फाऊंडेशन, मुंबई यांच्या आर्थिक सहाय्याने साने गुरूजी रूग्णालय व संशोधन केंद्र, किनवट येथे 0 ते 18 वयोगटातील मुला-मुलींच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रियेत 50% सुट दिली जात आहे. यावर्षी, जिशान फकीर शेख (रा. किनवट) आणि सुरज रामेश्वर पोटे (रा. सिंगारवाडी) यांना शस्त्रक्रिया करून घेतली होती आणि त्यांनी आर्थिक सहाय्यसाठी अर्ज केला होता. एकम फाऊंडेशन तर्फे त्यांचे आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले असून, लाभार्थींना धनादेश वितरण करण्यात आले.

या वितरण समारंभात साने गुरूजी रूग्णालयाचे वैद्यकीय संचालक डॉ. अशोक बेलखोडे आणि स्त्रीरोगतज्ञ डॉ. भाग्यश्री बेलखोडे - वरटकर यांच्या हस्ते धनादेश लाभार्थींना प्रदान केले गेले. या प्रसंगी शस्त्रक्रिया केलेले पाल्य व त्यांचे पालक उपस्थित होते.

हे एक महत्त्वाचे पाऊल आहे, ज्यामुळे गरीब व गरजू मुलांना त्यांच्या उपचारांवर आर्थिक भार कमी होईल आणि ते चांगल्या आरोग्याच्या दिशेने प्रगती करू शकतील.

@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@

**वर्धापनदिन कार्यक्रम 2024**

**साने गुरुजी जयंती व 29 व्या वर्धापन दिनानिमित्त विविध प्रबोधनात्मक कार्यक्रम संपन्न**

**दिनांक:** 24 डिसेंबर 2024
**स्थळ:** साने गुरुजी रुग्णालय, किनवट

**साने गुरुजी रुग्णालय, किनवट** येथे **साने गुरुजी जयंती** आणि **रुग्णालयाच्या 29 व्या वर्धापन दिनानिमित्त** विविध **प्रबोधनात्मक, सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन** 24 डिसेंबर ते 26 डिसेंबर 2024 दरम्यान करण्यात आले. या उपक्रमांची माहिती **रुग्णालयाचे प्रमुख व भारत जोडो युवा अकादमीचे अध्यक्ष डॉ. अशोक बेलखोडे** यांनी दिली होती.

कार्यक्रमाचे उद्घाटन मंगळवार, 24 डिसेंबर रोजी सकाळी 10 वाजता **प्रसिद्ध बालकथालेखक प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर व प्रा. स्वाती तौर (नांदेड)** यांच्या उपस्थितीत पार पडले. उद्घाटन सोहळ्यात अध्यक्षस्थानी उपस्थित विद्यार्थ्यांपैकी एक विद्यार्थी होता, ही बाब विशेष ठरली.

यानंतर **महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या सहकार्याने रंगभरण व चित्रकला स्पर्धा** (इयत्ता 4 थी ते 10 वी) घेण्यात आली. या प्रसंगी नांदेड परिसरातील 10 ते 12 जेष्ठ चित्रकारांनी विद्यार्थ्यांसोबत थेट चित्रे रेखाटली. प्रमुख पाहुणे म्हणून **सुजाता राऊत व शुभांगी आबनावे** (भारत जोडो सायकल यात्री, मुंबई) उपस्थित होत्या.

**मेहंदी स्पर्धा** दुपारी 12 ते 1.30 या वेळेत पार पडली. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून **अनिता (मुंबई)** यांची उपस्थिती लाभली.

**कथालेखन कार्यशाळा** सकाळी 10.30 ते दुपारी 1.30 या वेळेत पार पडली. शालेय व स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांसाठी "भारतीय संविधान व मानवी मूल्ये" तसेच "कथा कशी लिहावी?" या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

25.12.2024

**साने गुरुजी हॉस्पिटलमध्ये कर्मयोगी बाबा आमटे स्मृती व्याख्यानमाला, सुदृढ बालक स्पर्धा, उद्घाटन समारंभ व कवि संमेलन मोठ्या उत्साहात संपन्न**

कार्यक्रमाची सुरुवात साने गुरूजी रूग्णालय व संशोधन केंद्र किनवट येथे सकाळी 10 वाजता **सुदृढ बालक स्पर्धेने** झाली. या स्पर्धेमध्ये परिसरातील अनेक पालकांनी आपल्या बालकांसह सहभाग घेतला. **बालरोगतज्ज्ञांनी मुलांच्या आरोग्य तपासण्या करून त्यांची वाढ, पोषण व विकास याविषयी सखोल मार्गदर्शन केले.** "आपल्या बाळाची वाढ योग्य प्रकारे होत आहे का?" या विषयावर डॉक्टरांनी प्रात्यक्षिकासह माहिती दिली. या उपक्रमामुळे अनेक पालकांना मुलांच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण झाली.

दुपारी 3 वाजता रुग्णालयाच्या नूतनीकरण केलेल्या **बालरोग आणि स्त्रीरोग उपचार विभागाचे उद्‌घाटन सोहळा** पार पडला. या उद्‌घाटन प्रसंगी **साने गुरुजी हॉस्पिटलमध्ये नव्याने उपलब्ध करण्यात आलेल्या आधुनिक आरोग्य सेवा व उपकरणांबद्दल माहिती** देण्यात आली. आधुनिक सर्जरी कक्ष, नवजात शिशु दक्षता विभाग आणि स्त्रीरोग विभाग केंद्राचीही पाहणी करण्यात आली.

सायंकाळी 4 वाजता **मुक्त कला मंचाच्या वतीने आयोजित बाल कलाकारांच्या सादरीकरणाने रंगतदार वातावरण निर्माण झाले.** गायन, वादन, मिमिक्री, एकपात्री अभिनय, असंबंध भाषण, उत्स्फुर्त भाषण, लोककला व लोकनृत्य अशा विविध कलाविष्कारांनी लहानग्यांनी आपली कला सादर केली. प्रेक्षकांनी मोठ्या आनंदाने टाळ्यांचा गजर करत कलाकारांचे कौतुक केले.

साने गुरुजी इमर्जन्सी व मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, एमआयडीसी कोठारी येथे **बुधवार, 25 डिसेंबर** 2024 **रोजी कर्मयोगी बाबा आमटे स्मृती व्याख्यानमाला** आणि विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले **सायंकाळी 5 वाजता पार पडलेल्या कवी संमेलनात** नामवंत व स्थानिक कवींचा सहभाग होता. यामध्ये **प्रकाश घोडके, प्रा. डॉ. प्रकाश मोगले, श्रीकांत देशमुख, डॉ. आदिनाथ इंगोले, रवि प्रकाश चापके तसेच किनवट व परिसरातील कवयित्री आणि कवी** सहभागी झाले. देशप्रेम, समाजप्रबोधन, मानवता, निसर्ग आणि जीवनाच्या विविध पैलूंवर त्यांनी रचना सादर केल्या.

या संपूर्ण कार्यक्रमात **साने गुरुजी रुग्णालयाचे प्रमुख डॉ. अशोक बेलखोडे** आणि **भारत जोडो युवा अकादमीचे स्वयंसेवक** सक्रियपणे सहभागी झाले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रुग्णालयातील सर्व कर्मचारी, स्वयंसेवक आणि स्थानिक नागरिकांनी उत्तम संयोजन केले.

26.12.2024

**किनवट येथे कथाकथन, संवाद व संगीत महोत्सव — शिक्षक, महिलांसाठी विशेष उपक्रम पार पडले**

**साने गुरुजी रुग्णालय व भारत जोडो युवा अकादमी** यांच्या संयुक्त विद्यमाने **गुरुवार, 26 डिसेंबर** 2024 **रोजी विविध प्रबोधनात्मक आणि सांस्कृतिक उपक्रम** किनवट शहरात उत्साहात पार पडले.

सकाळी 11 ते दुपारी 3 या वेळेत **जि. प. हायस्कूल, किनवट येथे शिक्षकांसाठी "कथाकथन तंत्र व मंत्र"** या विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्‌घाटन **गटशिक्षण अधिकारी श्री. गंगाधरराव राठोड** यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी **ग्रंथमित्र दीपक बलसूरकर** यांनी कथाकथनातील विविध छटा, शिक्षकांसाठी आवश्यक तंत्र आणि कथेमध्ये विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवण्याची कला समजावून सांगितली. तसेच **प्रसिद्ध योग शिक्षक प्रा. श्रीराम चामले (उदगीर)** यांनी शिक्षकांमध्ये आत्मविश्वास व संवाद कौशल्य वाढवण्यासाठी योगाचे महत्त्व व मनःशांतीसाठी तंत्र शिकवले. या कार्यक्रमात परिसरातील अनेक शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

**दुपारी 2 ते 4 या वेळेत साने गुरुजी रुग्णालयाच्या सभागृहात आरोग्य विषयक "सिझर की नॉर्मल?"** या विषयावर विशेष संवाद सत्र पार पडले. गरोदर स्त्रिया, त्यांचे पालक आणि सामाजिक कार्यकर्त्यांसाठी आयोजित या सत्रात **अनुभवी स्त्रीरोगतज्ज्ञांनी** सिझेरियन व नैसर्गिक प्रसूती यातील फरक, आवश्यक बाबी, चुकीच्या समजुती आणि योग्य निर्णय घेण्यासाठी मार्गदर्शन केले. पालकांनी यामध्ये आपले प्रश्न उपस्थित करून माहितीपूर्ण चर्चा केली.

**सायंकाळी 7.30 ते 10.00 या वेळेत स्व. उत्तमरावजी राठोड स्मृती संगीत महोत्सव** भव्यदिव्य स्वरूपात पार पडला. या कार्यक्रमात **"त्रिवेणी"** या मराठी, हिंदी गाणी आणि कविता यांचे आगळे-वेगळे सादरीकरण करण्यात आले. यात **सुप्रसिद्ध गायक श्रीकांत उमरीकर, वैभव पांडे आणि गायिका वर्षा जोशी** यांनी आपली संगीतमय कला सादर करत रसिकांची मनं जिंकली. कार्यक्रमाचे खास आकर्षण ठरले **इशीता वंदना शिरीष पत्की (इयत्ता 9 वी, भूमिकन्या, किनवट)** हिचे सुश्राव्य गायन. तिच्या मधुर आवाजाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

या तीनही दिवशी झालेल्या कार्यक्रमांमध्ये विविध क्षेत्रातील मान्यवर, विद्यार्थी, शिक्षक, पालक, आरोग्य कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. **भारत जोडो युवा अकादमी आणि साने गुरुजी रुग्णालय परिवाराने या कार्यक्रमांचे आयोजन अत्यंत यशस्वीरीत्या पार पाडले.**

**@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@**

## अंधश्रद्धा निर्मुलन समिती

दि. 13.02.2025 रोजी झालेल्या अं.नि.स. च्या बैठकीत किनवटच्या नुतन कार्यकारीणीची निवड करण्यात आली, यावेळी अंनिसचे, राज्य कार्याध्यक्ष, माधव बावगे, डॉ. अशोक बेलखोडे, प्रा. उमाकांत इंगोल, ॲड मिलींद सर्पे, डॉ. पंजाब शेरे, प्रा. डॉ. सुरेंद्र शिंदे, प्रा. डॉ. मंदाकिनी राठोड, प्रा. उमेश भालेराव, प्रा. डॉ. हेमंत सोनकांबळे उपस्थित होते.

अ.नि.स. किनवटच्या अध्यक्षपदी प्रा. उमाकांत गुणवंतराव इंगोले, उपाध्यक्ष उत्तम कानिंदे, प्रा. सुलोचना व सुलोचना जाधव  कार्याध्यक्ष, ॲड मिलिंद सर्पे प्रधान सचिव प्रा. डॉ. पंजाब शेरे यांची निवड करण्यात आली.

@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@@

## पाहूणे भेटीला

**22.03.2025 जेष्ठ नेत्रतज्ञ डॉ. जिंतूरकर व जेष्ठ स्त्रिरोगतज्ञ, रोटेरियन डॉ. मीणा जिंतुरकर यांची साने गुरूजी रूग्णालयास सदिच्छा भेट.**

तत्पुर्वी भारत जोडो युवा अकादमी उभारत असलेले भव्य “ साने गुरूजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल” कोठारी  च्या बांधकामाला भेट दिली, व परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. व नंतर साने गुरूजी रूग्णालय व संशोधन केंद्र किनवट येथे भेट देऊन रूग्णालयाची व संस्थेच्या कामाची पाहणी करून डॉ. अशोक बेलखोडे यांच्या कार्याबद्दल गौरवोद्गार काढले.

जिल्ह्याच्या मुख्यालयापासून 150 कि. मी. अंतरावर वास्तव्यास राहून आपण करीत असलेली सामाजिक व वैद्यकीय सेवा अतुलनिय असल्याचे त्यांनी सांगितले.

दोन्ही सन्माननीय पाहूण्यांच्या साने गुरूजी रूग्णालयाच्या वतीने शाल व पुस्तक देऊन स्वागत करण्यात आले.

01.02.2025

**बलदोटा बंधु पुणे यांचे साने गुरूजी रूग्णालयास भेट**

पुणे येथील प्रसिध्द व्यावसायीक असलेले श्री. कांतीलालभाई बलदोटा व बेंगलूरू येथील व्यावसायीक असलेले श्री. मदनभाई बलदोटायांनी भारत जोडो युवा अकादमी संस्थेतर्फे उभारण्यात येत असलेल्या नविन प्रकल्पाच्या पहिल्या टप्याचे बांधकाम पूर्ण झाले असून निर्माण प्रकल्पाला भेट दिली.

संस्थेतर्फे सुरू असलेले बांधकाम पाहून समाधान व्यक्त केले व आणखी काय नाविण्यपूर्ण योजना अंमलात आणता येईल या संदर्भाने चर्चा केली. किनवटचे काम असेच सुरू ठेवण्यास सांगितले.

23.10.2024

**प्रभाकर चेडे, विश्वस्त भारत जोडो युवा अकादमी, रा. पुणे.**

भारत जोडो युवा अकादमी संस्थेचे विश्वस्त व मराठवाडा मित्र मंडळाचे सदस्य श्री. प्रभाकर चेडे यांनी साने गुरूजी रूग्णालयाला भेट दिली.

संस्था आधुनिकीकरणासाठी संगणक स्वरूपात मदत करण्यासाठी विविध मार्गाने प्रयत्न करीत असतांना मराठवाडा मित्र मंडळ, पुणे यांनी साने गुरूजी रूग्णालयाला 5 संगणक संच आणि तीन प्रिंटर दान स्वरूपात दिले ते प्रभाकर चेडे यांनी स्वत:च्या वाहनाने साने गुरूजी रूग्णालयात सुखरूप रित्या पोहोचवून डॉ. अशोक बेलखोडे यांच्या स्वाधीन केले.

**11.01.2025**

**विजय रायमाने, मुंबई**

भारत जोडो युवा अकादमी एम.आय.डी.सी. कोठारी  येथे उभारत असलेले नविन “साने गुरूजी इमर्जन्सी व मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल” च्या उभारणीसाठी निधी गोळा करणे, मदत मिळवुन देणे यासाठी संस्थेची माहिती घेण्याकरीता व बांधकामाची स्थिती जाणून घेण्याकरीता दिनांक 11 जानेवारी 2025 विजय रायमाने व त्यांचे सहकारी यांनी किनवटच्या साने गुरूजी रूग्णालयात भेट देऊन संस्थेची सर्व प्रमाणित माहिती नोंद करून घेतली.

संस्थेच्या कार्यासाठी विविध कंपन्या कडे सामाजिक दायीत्व निधी मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

**15.01.2025**

**श्रीधर रामचंद्र काळे, पैठण**

आज दिनांक 15 जानेवारी 2025 रोजी साने गुरूजी रूग्णालय, किनवट येथे बाबा आमटे यांच्या पहिल्या सायकल यात्रेतील सायकल यात्री प्रा. श्रीधर रामचंद्र काळे, राहणार पैठण जि. औरंगाबाद हे किनवट तहसिल

कार्यालयाद्वारे आयोजीत योग शिबीरासाठी योगशिक्षक म्हणून आले होते. या दरम्यान, त्यांनी 40 वर्षांपूर्वीची मैत्री जोपासत डॉ. अशोक बेलखोडे यांची आवर्जून भेट घेतली. सायकल यात्रेतील जुन्या आठवणींना उजाळा दिला आणि डॉक्टरांचा कामाचा आवाका पाहून त्यांनी त्यांचे भरभरून कौतुक केले.

रुग्णालयातर्फे प्रा. श्रीधर काळे, किनवटचे तहसिलदार डॉ. शारदा चौंडेकर, तलाठी मॅडम भाग्यश्री तेलंगे, किर्ती भिसे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. भाग्यश्री बेलखोडे, डॉ. योगेंद्र वरटकर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

ही एक सुंदर घटना होती ज्यामध्ये समाजसेवा, योग, आणि शुद्ध मित्रत्वाची भेट एकत्रितपणे दिसून आले.

- विजय खटी, नागपूर - 19.02.2025
- सतिष जोंधळे - 14.02.2025
- चेतन दिवेकर, श्री. राजन 23.01.2025
- अपर्णा रंगनेनीवार - 01.10.2024
- डॉ. योगेंद्र आणि डॉ. भाग्यश्री - 19.04.2024